महाराष्ट्र शासन

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Ph.No : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org

Email: roamravati@dtemaharashtra.gov.in **Fax No**: (0721) 2577913

कार्यासन क्रमांक १०

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/लसीकरण/२०२२/ 18

दिनांक :- 4 JAN 2022

प्रति,

प्राचार्य,
सर्व अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय :- कोविड -१९ लसीकरणासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याबाबत.

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :-
१०/एनजीपी/मरातंशिम/लसीकरण/२०२२/१० दिनांक ४ जानेवारी २०२२.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, राज्यामध्ये कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या मार्गदर्शक सुचनानुसार लसीकरण मोहीम सुरु आहे. अलीकडेच भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय यांनी वय वर्ष १५ ते १८ वयोगटातील मुलांच्या कोविड- १९ च्या लसीकरणाबाबतची मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. जारी केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यात देखील वय वर्ष १५ ते १८ वयोगटातील मुलांचे लसीकरण दिनांक ३/१/२०२२ पासून सुरु झालेले आहे

तसेच दिनांक ४/१/०२२ रोजी मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी, सर्व कुलगुरु यांच्या समवेत कोविड १९ च्या पार्श्वभुमीवर महाविद्यालयातील शैक्षणिक कामकाज, परीक्षा नियोजन, लसीकरण ई. बाबत आढावा बैठक घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीमध्ये मा.मंत्री महोदय यांनी लसीकरणासाठी पात्र असलेल्या पदविका संस्थामधील सर्व विद्यार्थ्यांचे (वय वर्ष १५ ते १८, तसेच १८ वर्षावरील) लसीकरण लवकरात लवकर पुर्ण करुन घेण्याबाबत निर्देश प्राप्त झालेले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या पदविका संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेल्या व लसीकरणासाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची (वय वर्ष १५ ते १८, तसेच १८ वर्षावरील) माहीती आपल्या जिल्हयातील मा.जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी. व त्यांचेशी समन्वय साधून पात्र विद्यार्थ्यांचे लसीकरण लवकरात लवकर पुर्ण करुन घ्यावे तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रक्रियायोजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.